खटला क्र :— १२०/पीडब्ल्यू/२०२० दि.१०/०८/२०२२.

**व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे** नि क्र:—

आरोपीचे कलम ३१३ फौ. प्र. सं. अन्वये जवाब

आरोपीचे नाव :— सोहेल हसन शेख.
वय :— २२ वर्षे.
कामधंदा :— निरंक.
रा. ठि. :— सांताक्रूझ (पू), मुंबई.

प्रश्न १ :— तुम्हांला असे सांगण्यात येत आहे की, तुम्हांला मी जे आत्ता प्रश्न विचारणार आहे त्यांची उत्तरे देण्यास तुम्ही कायदयाने बंधनकारक नाही. ती उत्तरे तुम्ही नाकारू शकता. तुम्ही जर उत्तरांस नकार दिला किंवा तुम्ही चुकीची उत्तरे दिली तर तुम्ही शिक्षेस पात्र ठरू शकत नाहीत. हे तुम्हांला समजले का?

उत्तर :— होय.

प्रश्न २ :— तुम्ही अभियोग पक्षाचापुरावा वाचला आहे का व तो तुम्हांला समजला आहे का?

उत्तर :— होय.

प्रश्न ३ :— सरकारी साक्षीदार क्र.—१.—सुरेश दगडू वांद्रे यांच्या पुराव्यामध्ये असे आले आहे की, दि.१०/१२/२०१८ रोजी, पोलीसांनी त्यांना बांद्रा लोहमार्ग पोलीस ठाणे येथे तुमचा अंगझडती पंचनामा करण्याकामी बोलाविले होते, त्याप्रमाणे ते पोलीस स्टेशनला गेले असता त्या ठिकाणी

तुम्ही आरोपी, पोलीस व दोन पंच हजर होते. या बाबत तुम्हांला काय सांगायचे आहे?

---

उत्तर :— मला माहित नाही.

प्रश्न ४ :— सरकारी साक्षीदार क्र.—१. यांच्या पुराव्यामध्ये असे आले आहे की, त्यानंतर पोलीसांनी तुमची अंगझडती घेतली असता सदर अंगझडतीमध्ये तुमच्याकडे व्हिवो कंपनीचा एक मोबाईल फोन मिळून आला. त्यानंतर पोलीसांनी पंचनामा करून सदरचा मोबाईल फोन जप्त केला. या बाबत तुम्हांला काय सांगायचे आहे?

---

उत्तर :— खोटे आहे.

प्रश्न ५ :— सरकारी साक्षीदार क्र.—२. नासीर हुसेन शेख यांच्या पुराव्यामध्ये असे आले आहे की, दि.०९/१२/२०१८ रोजी, पोलीसांनी त्यांना बांद्रा पोलीस ठाणे येथे पंचनाम्याकामी बोलाविले होते. त्याप्रमाणे ते बांद्रा पोलीस ठाणे येथे गेले. त्याठिकाणी तुम्ही हजर होता. तुमची त्यांच्या समक्ष अंगझडती घेतली असता तुमच्या अंगझडतीमध्ये हिरव्या रंगाचा एक मोबाईल फोन मिळून आला होता. त्यानंतर सदरचा मोबाईल फोन सील केला व पोलीसांनी पंचनामा तयार करून त्यावर पंच म्हणून त्यांची सही घेतली. त्या बाबत तुम्हांला काय सांगायचे आहे?

---

उत्तर :— माहित नाही.

प्रश्न ०६ :— सरकारी साक्षीदार क्र.—३. दत्तू गंगाराम गिते यांच्या पुराव्यामध्ये असे आले आहे की, फिर्यादी बरकद रेहमद अली यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा नोंद क्रमांक ३०६८/२०१८ दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास वरिष्ठांच्या तोंडी आदेशान्वये त्यांच्याकडे देण्यात आला. त्यानंतर श्री माने ३५६० पोलीस शिपाई यांनी तुम्हांला पकडून त्यांच्या ताब्यात दिले. त्यानंतर त्यांनी नासीर व सुरेश वांद्रे या दोन पंचाना बोलावून तुमची अंगझडती घेतली असता, तुमच्या अंगझडतीमध्ये तुमच्या पॅण्टच्या उजव्या खिशात हिरव्या रंगाचा मोबाईल फोन मिळून आला होता. त्यानंतर तुम्हांला अटक केली. त्या बाबत तुम्हांला काय सांगायचे आहे?

---

उत्तर :— खोटे आहे.

प्रश्न ०७ :— सरकारी साक्षीदार तुमच्या विरूध्द का साक्ष देत आहे?

---

उत्तर :— मला माहित नाही.

प्रश्न ०८ :— तुम्हांला आरोपीचा अंगझडती पंचनामा, अटक पंचनामा व मोबाईलचा जप्ती पंचनामा (नि. क्र.१७) व मुददेमाल कक्षात मोबाईल फोन जमा केल्याची पावती (नि. क्र.२२) या कागदपत्रांबाबत काय सांगावयाचे आहे ?

---

उत्तर :— खोटी आहेत.

प्रश्न ०९ :— तुम्हांला बचावासाठी तुमची अथवा अन्य कोणत्याही साक्षीदाराची साक्ष नोंदवण्याची आहे काय?

उत्तर :— नही.

प्रश्न १० :— तुम्हांला या खटल्याबाबत आणखी काही सांगावयाचे आहे काय?

उत्तर :— चुकिची फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

आरोपी
**व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे**

दिनांक :— १०/०८/२०२२.

माझ्या समक्ष,
स्वाक्षरी/—
(भा. कि. गावंडे)
महानगर दंडाधिकारी, ३६वे न्यायालय,
मुंबई सेंट्रल, मुंबई.

प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, वर नमूद आरोपीचे जवाब माझ्या समक्ष आणि माझ्या सुनावणीत नोंदविण्यात आले आहेत आणि संपूर्ण समाविष्ठता त्याने जवाब दिल्याप्रमाणे खरी आहे.

माझ्या समक्ष,
स्वाक्षरी/—
(भा. कि. गावंडे)
महानगर दंडाधिकारी, ३६वे न्यायालय,
मुंबई सेंट्रल, मुंबई.

दिनांक :—१०/०८/२०२२.
सराद.